क्र. १३७ पहिले वर्ष ६ एप्रिल २०२३

# रविवारची उपासना

## पवित्र गुरुवार/आज्ञा गुरुवार

### निवेदक

ख्रिस्ती माणसासाठी उपवासकाळ हा वसंतऋतू असतो. पापाकडून मोक्षाकडे जाण्याची संधी परमेश्वर पुन्हा एकदा आपल्या पदरात टाकत असतो. देवपित्याचं प्रेम आणि कृपेचा अनुभव व परिवर्तनाची संधी आपल्याला उपवासकाळातून मिळते.

आज पवित्र गुरूवार, म्हणजे प्रायश्चित काळातील शेवटचा दिवस तर इस्टर त्रिदिनामधला पहिला दिवस होय. येशूने या दिवशी आपल्या शिष्यांना प्रितीची आज्ञा दिली. म्हणून या दिवसाला आज्ञेचा गुरूवार असेही म्हणतात.

प्रवेश गीत : (वेदीसेवक, शिष्य व फादर्स वेदी जवळ येतील)

### प्रास्प्रस्तावना

पवित्र गुरूवार म्हणजे जुन्या करारातील इस्त्रायली लोकांचा वल्हांडनाचा सण. फारो राजाच्या गुलामगिरीतून इस्त्रायली लोकांची सुटका करून परमेश्वराने त्यांना मोशेद्वारे दुधामधाच्या प्रदेशात नेले. इस्त्रायली लोकांनी हा प्रवास तांबडा समुद्र ओलांडून केला. हा ओलांडनाचा अनुभव म्हणजे, त्यांच्यासाठी गुलामगिरीतून स्वातंत्र्याकडे जाण्याचा, अविश्वासाकडून विश्वासाकडे जाण्याचा, अन्यायाकडून न्यायाकडे जाण्याचा, आणि द्वेषाकडून प्रेमाकडे जाण्याचा प्रवास होता.

नव्या करारात देखील जगाच्या तारणासाठी, लोकांना पापाकडून पुण्याकडे आणि अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी पित्याच्या तारणदायी प्रेमाच्या योजनेला वेंग मारावी लागेल आणि आपल्याला आत्मसमर्पण करावे लागेल, याची ख्रिस्ताला जाणीव होती. म्हणूनच आपल्या दुःखसहनापूर्वी प्रभू येशू ख्रिस्ताने आपल्या शिष्यांबरोबर अखेरचे भोजन घेतले. त्याप्रसंगी, ख्रिस्ताने मानवाच्या तारणासाठी व प्रेषितीय कार्य जगाच्या अंतापर्यंत अविरत आणि अखंडित चालू राहावे म्हणून धर्मगुरूपदाची व पवित्र मिस्साबलिची स्थापना केली.

धर्मगुरूपद म्हणजे ख्रिस्ताच्या अतिपवित्र हृदयातील प्रेमाचे प्रतिबिंब. ईश्वरी हाक आणि साद म्हणजे धर्मगुरू. आज ख्रिस्तसभा धर्मगुरूचाही सण साजरा करत आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक धर्मगुरू ख्रिस्ताप्रमाणे स्वत:चे शरीर मोडून प्रेषितीय कार्य करत आहेत.

आजच्या मिस्साबलिदानात सहभागी होताना धर्मगुरूपदाबद्दल ख्रिस्ताला धन्यवाद देऊ या; व आपल्या स्वतःच्या जीवनात, धर्मग्रामात, धर्मप्रांतात ज्या-ज्या धर्मगुरूंनी मार्गदर्शन, सहकार्य व सेवाकार्य केले आहे त्यांच्यासाठी विशेष प्रार्थना करू या, कदाचित धर्मगुरूपदाचा अपमान केला असल्यास परमेश्वराजवळ आपण क्षमा मागू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, तुझ्या एकुलत्या पुत्राने आपल्या अपार प्रेमाचे प्रतीक म्हणून आपल्या ख्रिस्तसभेसाठी पवित्र भोजनाची प्रस्थापना केली. त्या भोजनात सहभागी होण्यासाठी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. आपल्या मृत्यूची वेळ जवळ आली असता त्याने हे पवित्र भोजन आम्हांस दिले आणि नवे व शाश्वत बलिदान म्हणून हे भोजन साजरे करण्याची आम्हांला आज्ञा केली. या बलिदानाद्वारे आम्हाला परिपूर्ण प्रीती व जीवन मिळू दे. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### प्रभुशब्दविधी

**निवेदक:**(पहिल्या वाचनापूर्वी)

तांबड्या समुद्रातून कोरड्या जमिनीवर चालत नेऊन देवाने इस्त्रायली लोकांची फारोच्या गुलामगिरीतून सुटका केली. त्याची आठवण म्हणून इस्त्रायली लोक वल्हांडणाचे भोजन कशाप्रकारे सेवन करत ह्याचा अनुभव आपण पहिल्या वाचनातून घेऊ या.

### पहिले वाचन

**निर्गम** १२:१-८, ११-१४.

### प्रतिसाद स्तोत्र

११५:१२-१३, १५-१६, १७-१८

**निवेदक :** (दुसऱ्या वाचनापूर्वी)

प्रभूख्रिस्ताच्या शेवटच्या भोजनाचे महत्व संत पौल करिंथकरास पाठवलेल्या पत्रातून आपणास सांगत आहे. त्यावर आपण चिंतन करू या.

### दुसरे वाचन

**संत पौलाचे करिंथकरास पत्र** ११: २३-२६.

### जयघोष

**निवेदक :** (शुभवर्तमान वाचनापूर्वी)

ख्रिस्ताने आपल्या शेवटच्या भोजनाच्यावेळी आपल्या शिष्यांचे पाय धुवून सेवेबरोबर नम्रतेचा महान कित्ता घालून दिला हे आपण योहानच्या शुभवर्तमानातून अनुभवू या.

**योहान १३:३४**

## शुभवर्तमान

**योहान १३:१–१५ (प्रवचन)**

**निवेदक:** आता प्रमुख धर्मगुरू निवडलेल्या बारा प्रेषितांचे पाय धुतील. कृपया उमेदवारांनी वेदीजवळ यावे.

**निवेदक:** (शांतपणे) पायधुणीच्यावेळी येशू भोजनावरून उठला व त्याने आपली बाह्यवस्त्रे काढून ठेवली आणि रूमाल घेऊन कमरेस बांधला. मग तो घंगाळात पाणी ओतून शिष्यांचे पाय धुऊ लागला व कमरेस बांधिलेल्या रुमालाने तो पुसू लागला. तदनंतर तो म्हणाला, ''मी प्रभू व गुरू असूनही जर तुमचे पाय धुतले तर तुम्हीही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत, कारण जसे मी तुम्हांला केले तसे तुम्हीही करावे म्हणून मी तुम्हाला कित्ता घालून दिला आहे.''

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, येशूचा पुनरुत्थानदिन जवळ येत आहे. दु:खसहन, मरण आणि पुनरुत्थान याद्वारे स्नानसंस्कार घेतलेल्या आम्हाला आणि अखंड जगाला ख्रिस्ताच्या जीवनात अधिक सहभाग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे मन:पूर्वक प्रार्थना करू या.

प्रतिसाद : **नम्र होऊनी प्रभु तुज करितो वंदना.**

१. ख्रिस्तसभेचे मेंढपाळ पोप महाशय, कार्डिनल्स, बिशप्स, सर्व धर्मगुरूंना ख्रिस्तसभेची धुरा सांभाळण्यास प्रभूची कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करूया.

२. जगातील अखिल ख्रिस्तीजनांनी एकत्र व्हावे, सर्वांनी ख्रिस्ताच्या नेतृत्वाखाली एक कळप बनावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. आपल्या धर्मग्रामातील गरजवंत, आजारी व एकाकी यांच्यावर प्रभूची विशेष कृपा रहावी तसेच त्याची प्रेमाने सेवा करण्यास कृपा आपल्याला मिळावी म्हणून प्रार्थना करूया.

४. आजच्या तरूणांना धर्मगुरू होण्याचे पाचारण घडावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

५. आता आपण थोडा वेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया...

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांजवळ रहा आणि आमच्या प्रार्थना ऐक. आमच्या अनेक गरजा आहेत. परंतु आम्हाला त्या व्यक्त करता येत नाहीत. त्या तू जाणतोस म्हणूनच तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्या मरण आणि दु:खसहनाद्वारे आम्ही तुझ्या साहाय्याची याचना करतो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, जेव्हा आम्ही हे पवित्र बलिदान साजरे करतो तेव्हा आमचे तारणकार्य घडून येत असते. या बलिदानात सहभागी होण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

सर्वसमर्थ परमेश्वरा, तुझ्या पुत्राने या जगात आम्हासाठी प्रस्थापित केलेल्या भोजनामुळे आम्हाला नवजीवन प्राप्त होते. या भोजनामुळे तुझ्या स्वर्गीय राज्यातील सुखशांतीचा परिपूर्ण अनुभव आम्हाला येऊ दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आजच्या उपासनेतील शास्त्रवाचने आपल्याला पवित्र मिस्सा, धर्मगुरूपद आणि प्रीतीची नवी आज्ञा ह्या तीन विषयांवर तीन चिंतने सादर करतात :

**अ) मानवाला पापाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रभू येशू ओलांडणाचे कोकरू बनला :** आजचे पहिले वाचन (निर्गम १२:१–८, ११–१४). मत्तय, मार्क व लूक हे शुभवर्तमानकार येशूच्या अखेरच्या भोजनाला ओलांडणाचे भोजन म्हणत असले तरी योहान मात्र येशू हाच त्या ओलांडणाचे कोकरू आहे असे मानतो. ज्या वेळी जेरूसलेमच्या मंदिरात ओलांडणाचे कोकरू (यज्ञपशू) मारले जाई त्याचवेळी येशूच्या कुशीत भाला भोसकला गेला असे योहान नमूद करतो. 'त्याचे एकही हाड मोडले जाणार नाही;' 'एजोबाच्या काठी'चा उल्लेख, ओलांडणाचे भोजन करता यावे म्हणून सरकारवाड्यात न जाणारे यहुदी इत्यादींचा उल्लेख योहानच्या भूमिकेला पुष्टी देतो. ज्याप्रमाणे कोकराच्या रक्ताने इस्राएली लोकांचा बचाव झाला त्याप्रमाणे येशूने आपल्या रक्ताने मानवाचे पापांपासून तारण केले असे योहान सुचवितो.

**ब) मानवाला सार्वकालिक जीवन देण्यासाठी येशू मिस्साबलीचा केंद्रबिंदू बनला :** आजचे दुसरे वाचन (१ करिंथ. ११:२३–२६) भाकर मोडणे व द्राक्षारस पिणे ह्यांचा संबंध येशूच्या क्रूसावरील बलिदानाशी जोडतात. ख्रिस्तसभा हे ख्रिस्ताचे रहस्यमय शरीर असून तिला पवित्र मिस्साबलीकडून आध्यात्मिक शक्ती लाभत असते असे संत पौल सूचित करतो.

**क) मानवाला बिनशर्त प्रेमाचा कित्ता घालून देण्यासाठी येशू आपल्या प्रेषितांचे पाय धुतो :** आजचे शुभवर्तमान (योहान १३:१–१५) येशूच्या प्रेमाचा सेवाभावी पैलू अधोरेखित करतो. पवित्र मिस्साबलीत येशूच्या पंक्तीस बसल्यामुळे मानवाला सेवेची प्रेरणा मिळायला हवी असे खुद्द येशू सूचित करतो.

**आत्मपरीक्षण :** येशूच्या अखेरच्या भोजनाचा कोणता पैलू आपल्याला प्रेरणादायी वाटतो? त्याद्वारे निष्ठावंत ख्रिस्ती जीवन जगण्यास आपणांस कशी प्रेरणा मिळते?

•••

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)